सोलापूर
तरुण भारत
सदाफुली
https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com
बुधवार, ११ मार्च २०२६

आतील पानावर

पान २– त्यांच्यामुळे माझा मार्ग सोपा झाला
पान ३– 'तुम्बाड २'मध्ये नवाजुद्दीन सिद्दीकीची एंट्री
पान ४– चिकनी चमेलीसारखं गाणं पुन्हा गाणार नाही
पान ५– रश्मिका–विजयनं जिंकलं लोकांचं मन
पान ७– 'सालबर्डी' गावात 'ती' एन्ट्री घेणार

# 'हीर रांझा'त सारा अर्जुनची एंट्री?

रोमँटिक चित्रपटांसाठी ओळखले जाणारे दिग्दर्शक इम्तियाज अली यांनी आपल्या नव्या 'हीर रांझा' या चित्रपटाची घोषणा करून चाहत्यांना मोठे सरप्राइज दिले होते. अनाउन्समेंट व्हिडिओमध्ये त्यांच्या आधीच्या लैला मजनू या चित्रपटातील काही झलक दाखवण्यात आल्या होत्या. त्यामुळे हा चित्रपटही एक हृदयस्पर्शी आणि क्लासिक प्रेमकथा असणार, हे स्पष्ट झाले आहे. आता या चित्रपटाच्या कास्टिंगबाबत जोरदार चर्चा सुरू झाली आहे. 'हीर रांझा' ही प्रसिद्ध पंजाबी लोककथेवर आधारित प्रेमकथा आहे. ही कथा अनेक वर्षांपासून लोकांच्या मनात घर करून आहे.

या नव्या आवृत्तीत ती भव्य आणि भावनिक स्वरूपात मांडली जाणार असल्याचे सांगितले जात आहे. काही माध्यमांच्या अहवालानुसार, हा चित्रपट 'लैला मजनू'च्या कथाविश्वाचा पुढचा भाग मानला जात आहे. या चित्रपटाची निर्मिती एकता कपूर करणार आहेत. त्यांनी याआधीही इम्तियाज अली यांच्यासोबत काम केले आहे. चित्रपटाच्या मुख्य अभिनेत्रीच्या भूमिकेसाठी सध्या सारा अर्जुन हिचे नाव आघाडीवर असल्याची चर्चा आहे. 'धुरंधर' या चित्रपटातून तिने विशेष ओळख मिळवली. निर्माते 'हीर'च्या भूमिकेसाठी नव्या आणि निरागस चेहऱ्याच्या शोधात आहेत, आणि सारा या भूमिकेसाठी योग्य ठरू शकते, असे म्हटले जात आहे. तिच्या अभिनयातील सहजता आणि भावनिक अभिव्यक्ती या भूमिकेला साजेशी ठरू शकते. तर 'रांझा'च्या भूमिकेसाठी रोहित सराफ याचे नाव चर्चेत आहे. अधिकृत घोषणा अद्याप झालेली नसली तरी सारा आणि रोहित ही जोडी पडद्यावर ताजी आणि आकर्षक वाटू शकते, असे मत व्यक्त केले जात आहे. दोघांचीही रोमँटिक प्रतिमा या क्लासिक प्रेमकथेला साजेशी ठरू शकते.

वर्कफ्रंटबाबत बोलायचे झाले तर सारा अर्जुन लवकरच 'धुरंधर २'मध्ये दिसणार आहे. या चित्रपटात तिच्यासोबत रणवीर सिंह मुख्य भूमिकेत असणार आहेत. हा चित्रपट १९ मार्च रोजी प्रदर्शित होणार आहे. सध्या 'हीर रांझा'च्या अधिकृत कास्टिंग घोषणेची सर्वांना उत्सुकता आहे. इम्तियाज अली यांच्या दिग्दर्शनात आणि एकता कपूर यांच्या निर्मितीत साकार होणारी ही प्रेमकथा प्रेक्षकांच्या मनात पुन्हा एकदा प्रेमाची जादू निर्माण करेल, अशी अपेक्षा आहे.





# त्यांच्यामुळे माझा मार्ग सोपा झाला

प्रियांका चोप्रा बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेत्री आहे. तिने इंडस्ट्रीत स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली. बॉलीवूडमध्ये काम केल्यानंतर तिने हॉलीवूडमध्येही काम करायला सुरूवात केली. परंतु, तिच्यासाठी हा प्रवास नक्कीच सोपा नव्हता. अशातच आता तिने ऐश्वर्या राय व दिवंगत अभिनेते इरफान खान यांचे आभार मानले आहेत. प्रियांकापूर्वी ऐश्वर्या राय व इरफान खान यांनी हॉलीवूड चित्रपटांत काम करत तिथेही त्यांच्या अभिनयाची छाप सोडली आणि इतरांसाठी एक नवीन मार्ग तायर केला. परंतु, आजवर असे अनेक कलाकार आहेत, ज्यांनी हॉलीवूडमध्ये काम केलं आहे. मात्र, प्रियांका चोप्रा ही सातत्यानं तिथे काम करीत असून, तिने तिथेही स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली आहे. प्रियांका चोप्राने अलीकडेच दिलेल्या मुलाखतीत याबद्दल सांगितलं आहे. हॉवर्ड इंडिया कॉन्फरन्सदरम्यान अभिनेत्री म्हणाली, मला खूपदा असं वाटतं की, माझ्या आधी इथे येऊन, काही हुशार आणि कलागुणांनी संपूर्ण असलेल्या कलाकारांनी काम केलं आहे, ज्यामुळे माझा मार्ग सोपा झाला आहे. ऐश्वर्या राय एक उत्तम अभिनेत्री आहे. ती हॉलीवूडमध्ये काम करत होती. इरफान खान यांनीसुद्धा काम केलं आहे. त्यांनी काम केलं असल्यानं मला ते करणं सोपं गेलं. ऐश्वर्या रायनं यापूर्वी हॉलीवूडमधील अनेक चित्रपटांत काम केलं आहे. तिनं 'द पिंक पँथर २', 'रावण', 'ॲक्शन रिप्ले', 'द लास्ट लीजन, प्रोवोक्ड', 'द मिस्ट्रेस ऑफ स्पायसीस', 'ब्राइड अँड प्रीजुडाइयस' यांसारख्या चित्रपटांत काम करत तिच्या सहजसुंदर अभिनय आणि सौंदर्याच्या जोरावर तिनं जगभरातील प्रेक्षकांची मनं जिंकली आहेत. इरफान खान यांच्याबद्दल बोलायचं झालं, तर त्यांनी 'जुरॅसिक वर्ल्ड', 'द अमॅझिंग स्पायडर मॅन', 'इनफेरनो', 'लाइफ ऑफ पी' यांसारख्या हॉलीवूड चित्रपटांत काम केलं आहे.

इरफान खान यांनी बॉलीवूडमध्येही उत्तम कथानक असलेल्या चित्रपटांत महत्त्वपूर्ण भूमिका साकारत प्रेक्षकांच्या मनावर राज्य केलं आहे. अनेक कलाकारही त्यांच्या अभिनयाचे चाहते आहेत. त्यामुळेच आज ते हयात नसतानाही अनेकजण त्यांना 'मिस' करत असतात. दरम्यान, प्रियांका चोप्राबद्दल बोलायचं झालं, तर याव्यतिरिक्त अभिनेत्री सध्या तिच्या आगामी 'वाराणसी' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. त्यामधून ती दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीत पदार्पण करत आहे; तर तब्बल सहा वर्षांनी भारतीय सिनेमात ती पुनरागमन करत आहे.



# 'रामायण'मधील 'लक्ष्मणा'च्या भूमिकेसाठी 'या' अभिनेत्याची कडक मेहनत



दिग्दर्शक नितेश तिवारी यांचा आगामी 'रामायण' हा चित्रपट सध्या सर्वात मोठा चर्चेचा विषय ठरला आहे. या चित्रपटात प्रभू श्रीराम यांची भुमिका अभिनेता रणबीर कपूर साकारणार आहे. तर प्रभू श्रीराम यांच्या लाडक्या भावाची म्हणजेच 'लक्ष्मण'ची भूमिका लोकप्रिय अभिनेता रवी दुबे साकारणार आहे. या ऐतिहासिक भूमिकेसाठी रवीने शारीरिक, मानसिक व बौद्धिक तयारी केली, जी भूमिकेला पडद्यावर जिवंत करण्यासाठी गरजेची असते. या महत्त्वपूर्ण भूमिकेसाठी त्यानं कडक फिटनेस ट्रेनिंग घेतलं. याची एक झलक त्यानं सोशल मीडियावर शेअर केली आहे.

रवि दुबे सोशल मीडियावर नेहमीच सक्रिय असतो. ते आपल्या चाहत्यांसोबत नियमितपणे फोटो आणि व्हिडीओ शेअर करत असतो. अलीकडेच त्यानं आपल्या फिटनेसची झलक दाखवणारा एक फोटो इंस्टाग्रामवर पोस्ट केला. या दमदार शर्टलेस फोटोनं चाहत्यांचे लक्ष वेधून घेतले. या फोटोला त्याने रायझिंग अप असे कॅप्शन दिले असून बॅकग्राउंडला आयज ऑफ द टायगर हे आयकॉनिक गाणे वाजत आहे. एखाद्या योध्याला साजेशी शरीरयष्टी त्याने कमावली असल्याचे या फोटोवरून स्पष्ट होते.

रवी दुबेने या भूमिकेसाठी कमालीची शिस्त पाळली आहे. 'रामायण'सारख्या मोठ्या प्रकल्पाचा पहिला भाग चित्रित झाला असून, रवीच्या या शरीरयष्टीवरून त्याने या पात्रासाठी किती घाम गाळला आहे, याची कल्पना येते. रवीचा हा नवीन अवतार पाहताच चाहत्यांनी कमेंट सेक्शनमध्ये कौतुकाचा वर्षाव केला आहे. खरा योद्धा!, काय जबरदस्त ट्रान्सफॉर्मेशन आहे अशा कमेंट्स चाहत्यांनी केल्या आहेत. अनेकांनी त्याच्या मेहनतीचे कौतुक करताना तो या भूमिकेसाठी 'परफेक्ट' असल्याचे म्हटले आहे.

# तो सिनेमा न पाहण्याची सुनील शेट्टीने घेतली शपथ



नवदच्या काळात बॉलीवूड चित्रपटांतून प्रेक्षकांच्या मनावर राज्य केलेल्या अनेक कलाकारांच्या मुलांनी इंडस्ट्रीत पदार्पण केलं आहे. त्यापैकीच एक अभिनेते म्हणजे सुनील शेट्टी. सुनील शेट्टी यांचा मुलगा अहान शेट्टी सध्या त्याच्या 'बॉर्डर २' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. ९० च्या काळात जे. पी. दत्ता दिग्दर्शित 'बॉर्डर' हा चित्रपट सुपरहिट ठरला होता. त्यामध्ये सनी देओल, सुनील शेट्टी, जॅकी श्रॉफ, अक्षय खन्ना यांसारखे अनेक लोकप्रिय कलाकार एकत्र झळकले होते. अशातच आता अनेक वर्षांनंतर या चित्रपटाचा सीक्वेल प्रदर्शित झाला, ज्याला प्रेक्षकांनी चांगला प्रतिसाद दिला. अहान शेट्टी यामध्ये महत्त्वपूर्ण भूमिकेतून झळकत आहे. परंतु, सुनील शेट्टी यांनी अद्याप त्यांच्या मुलाचा चित्रपट पाहिलेला नाही. सुनील शेट्टी यांनी, जोवर 'बॉर्डर २' हा चित्रपट ५०० कोटींची कमाई करत नाही, तोपर्यंत ते हा चित्रपट पाहणार नाहीत, अशी शपथ घेतली होती. आता त्यांनी याबद्दल पुन्हा एकदा प्रतिक्रिया दिली आहे. सुनील शेट्टी त्यांच्या मुलाच्या 'बॉर्डर २' या चित्रपटाबद्दल काय म्हणाले, त्याबद्दल सविस्तर जाणून घेऊया. २३ जानेवारी रोजी प्रदर्शित झालेल्या 'बॉर्डर २' या चित्रपटाला प्रदर्शित होऊन एक महिना झाला आहे आणि आता हा चित्रपट लवकरच ५०० कोटींच्या कमाईचा टप्पा गाठणार आहे. महत्त्वाची बाब म्हणजे सुनील शेट्टी यांनी त्यांचा शब्द पाळला. सुनील यांनी अजूनही त्यांच्या मुलाचा हा चित्रपट पाहिलेला नाही. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत त्यांनी याबद्दल हा देशभक्तीपर चित्रपट असल्यामुळे या चित्रपटानं ५०० कोटींची कमाई केलीच पाहिजे, असं म्हटलं आहे.ए. सुनील शेट्टी याबद्दल म्हणाले, मी खूप आधीच चित्रपट प्रदर्शित होण्यापूर्वी असं ठरवलेलं की, हा एक देशभक्तीपर चित्रपट असल्यामुळे या चित्रपटानं ५०० कोटींची कमाई केलीच पाहिजे आणि तेव्हाच मी ठरवलेलं की, तरच मी हा चित्रपट पाहीन. सॅकनिल्कच्या वृत्तानुसार सनी देओलच्या 'बॉर्डर २'नं आतापर्यंत जगभरात जवळपास ४४७ कोटींची कमाई केली आहे. सुनील पुढे म्हणाले, मला असं वाटतं की, एका वडिलांच्या प्रेमापोटी देवाच्या कृपेनं हा चित्रपट ५०० कोटींची कमाई करेल. ते माझे शब्द होते, त्या माझ्या भावना होत्या; पण आता आम्ही त्यामध्ये अडकलो आहोत आणि त्यामुळेच मी अजूनही चित्रपटातील एक फ्रेमसुद्धा पाहिलेली नाही.

# ‘तुम्बाड २’मध्ये नवाजुद्दीन सिद्दीकीची एन्ट्री

बहुचर्चित ‘तुम्बाड २’ या चित्रपटाबाबत मोठी अपडेट समोर आली आहे. प्रेक्षक ज्या सिक्वेलची आतुरतेने वाट पाहत होते, त्या चित्रपटात आता दमदार अभिनेता नवाजुद्दीन सिद्दीकी यांची अधिकृत एंट्री झाली आहे. निर्माते आणि अभिनेता सोहम शाह यांनी सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत ही घोषणा केली. त्यामुळे चाहत्यांमध्ये उत्साहाची लाट उसळली आहे. २०१८ साली प्रदर्शित झालेल्या तुम्बाड या चित्रपटाने वेगळ्या कथानकामुळे आणि गूढ वातावरणामुळे प्रेक्षकांची मनं जिंकली होती. ‘हस्तर’ या रहस्यमय पात्राभोवती फिरणारी ही कथा प्रेक्षकांना एका वेगळ्याच दुनियेत घेऊन गेली.

चित्रपटाला सुरुवातीला मर्यादित प्रतिसाद मिळाला असला, तरी नंतर तो कल्ट फिल्म ठरला. री-रिलीज झाल्यानंतरही प्रेक्षकांनी चित्रपटाला भरभरून प्रतिसाद दिला. आता ‘तुम्बाड २’मध्ये नवाजुद्दीन सिद्दीकी सहभागी होणार असल्याने चित्रपटाची उत्सुकता आणखी वाढली आहे. सोहम शाह यांनी त्यांच्या अधिकृत इंस्टाग्राम अकाउंटवर नवाजुद्दीन सिद्दीकी यांच्यासोबतचे दोन फोटो शेअर केले. या फोटोंमध्ये दोघेही काळ्या पोशाखात दिसत आहेत. त्यांच्या हातात ‘तुम्बाड’शी संबंधित काही प्रॉप्सही दिसतात. या पोस्टसोबत सोहम शाह यांनी लिहिले की, आपल्या काळातील सर्वोत्तम अभिनेत्यांपैकी एक नवाजुद्दीन सिद्दीकी ‘तुम्बाड २’मध्ये सहभागी झाले आहेत. नवाज भाई, तुमचं स्वागत आहे. या घोषणेनंतर चाहत्यांनी कमेंट्सचा अक्षरशः पाऊस पाडला. अनेकांनी नवाजुद्दीन सिद्दीकी यांना शुभेच्छा दिल्या, तर काहींनी चित्रपटाबद्दल आपली उत्सुकता व्यक्त केली. नवाजुद्दीन सिद्दीकी हे त्यांच्या वास्तववादी आणि प्रभावी अभिनयासाठी ओळखले जातात. गंभीर, गूढ आणि वेगळ्या भूमिका साकारण्यात त्यांचा हातखंडा आहे. त्यामुळे ‘हस्तर’च्या गूढ आणि भयावह जगात त्यांची भूमिका कशी असेल, याबद्दल चर्चा सुरू झाली आहे. मात्र, त्यांच्या पात्राबाबत अद्याप कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. सोहम शाह हे या चित्रपटाचे प्रमुख चेहरा आहेत. पहिल्या भागात त्यांनी साकारलेली भूमिका खूप गाजली होती. आता दुसऱ्या भागात नवाजुद्दीन सिद्दीकी यांच्यासोबत त्यांची जुगलबंदी पाहायला मिळणार आहे. दोघेही दमदार कलाकार असल्याने पडद्यावर त्यांची केमिस्ट्री कशी रंगते, हे पाहणं रंजक ठरणार आहे. ‘तुम्बाड’ला मिळालेल्या यशानंतर प्रेक्षकांच्या अपेक्षा खूप वाढल्या आहेत. कथा, वातावरण, संगीत आणि अभिनय या सगळ्यांनी पहिल्या भागात वेगळा ठसा उमटवला होता. त्यामुळे ‘तुम्बाड २’ त्या अपेक्षांवर खरा उतरेल का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

सध्या चित्रपटाच्या शूटिंगबाबत किंवा रिलीज डेटबाबत अधिक माहिती जाहीर करण्यात आलेली नाही. मात्र, नवाजुद्दीन सिद्दीकी यांच्या एंट्रीमुळे चित्रपटाबद्दलची चर्चा रंगली आहे. ‘हस्तर’च्या गूढ जगात आता कोणता नवा थरार उलगडणार, याची उत्सुकता प्रेक्षकांना लागली आहे.



# सत्यापेक्षा सनसनाटीला महत्त्व देणं...,

जान्हवी कपूर बॉलिवूडच्या उत्तम अभिनेत्रींपैकी एक मानली जाते. जान्हवीने २०१८ मध्ये इशान खट्टरसह 'धडक' चित्रपटातून आपल्या बॉलिवूड करिअरची सुरुवात केली होती. सध्या अभिनेत्रीने एका मुलाखतीत केलेल्या वक्तव्यामुळे सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे. या मुलाखतीमध्ये तिने भाऊ अर्जुन कपूरच्या सोशल मीडिया ट्रोलिंगवर प्रतिक्रिया दिली आहे. एका मुलाखतीत जान्हवी म्हणाली की, सोशल मीडियावर कोणालाही ट्रोल करणं चुकीचं आहे. या संवादादरम्यान, जान्हवीने म्हटलं, सोशल मीडिया ट्रेंडबद्दल मला आता समजलंय की प्रत्येकाला व्ह्यूज आणि प्रसिद्धी हवी असते. म्हणून जर ते तुमच्याबद्दल कंटेंट तयार करत असतील तर तुम्ही फक्त बळीचा बकरा आहात. कोणत्याही गोष्टींची पडताळणी न करता तुमचं नाव क्लिक बेइटसाठी वा-परत आहेत. हे एखाद्याला टार्गेट करण्यासारखं आहे, जिथे सत्यापेक्षा सनसनाटीला जास्त महत्त्व दिलं जातं. पुढे ती म्हणाली, प्रत्येकाला जबाबदारी असते. आपलं घर चालवायचं असतं. मात्र,असे गैरसमज पसरवले गेले तर खूप वाईट वाटतं. जसं मी माझ्या भावासोबत घडताना पाहिलं आहे. त्यामुळे अशा गोष्टींमध्ये किती अडकायचं हे वेळीच कळणं गरजेचं आहे. नकारात्मकता ही नकारात्मकतेला जन्म देते आणि तुम्हाला फक्त अशा गोष्टीपासून कसं लांब राहता येईल, याकडे लक्ष द्यायचं आहे. जान्हवीच्या कामाबद्दल बोलायचं झालं तर अलिकडेच ती सनी संस्कारी की तुलसी कुमारी या चित्रपटात दिसली होती. लवकरच जान्हवी राम चरणच्या 'पेड्डी' या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.



# मांजरेकर दिसणार ‘जय हिंद जय सिंध’ सिनेमात

मोठ्या पडद्यावर अभिनय आणि दिग्दर्शनाव्यतिरिक्त, महेश मांजरेकर हे रंगभूमीच्या जगातही सक्रिय आहेत. ते पुन्हा एकदा नाट्यनिर्माते अश्विन गिडवानी यांच्यासोबत काम करत आहेत. यावेळी, महेश ॲनिमल या हिंदी नाटकाद्वारे रंगभूमीवर परतत आहेत. हे अनेक वर्षांनंतरचे सहकार्य आहे; यापूर्वी त्यांनी डबल डील हे नवीन नाटक केले होते. महेश मांजरेकर यांनी ॲनिमल हे हिंदी नाटक दिग्दर्शित केले आहे आणि ते त्यात मुख्य भूमिका देखील साकारत आहेत. त्यांच्या व्यक्तिरेखेबद्दल बोलताना महेश मांजरेकर म्हणतात, माझे पात्र दतू हे काही नायक नाही. तो असाधारणही नाही. तो एक साधा माणूस आहे जो स्वप्नांनी भरलेला सुटकेस आणि भुकेने भरलेले पोट घेऊन मुंबईत येतो. मी त्याच्यासारखे हजारो लोक पाहिले आहेत. काही मोजकेच स्टार बनतात. बहुतेक सावली बनतात. मी या पात्राच्या निरागसतेने आकर्षित झालो. या पात्राद्वारे महेश प्रेक्षकांना एक हृदयस्पर्शी कथा सांगेल. रंगभूमीव्यतिरिक्त, महेश मांजरेकर चित्रपटांमध्येही सक्रिय आहेत. ते जय हिंद जय सिंध या चित्रपटात दिसणार आहेत. चित्रपटाचे मोशन पोस्टर नुकतेच प्रदर्शित झाले. चित्रपटात जया प्रदा, जरीना वहाब, विक्रम कोचर, उपासना सिंग आणि अमित बहल यांच्याही भूमिका आहेत. हा चित्रपट इंद्रजीत लंकेश यांनी दिग्दर्शित केला आहे.





श्रेया घोषाल बॉलीवूडमधील लोकप्रिय गायिका आहे. तिने आतापर्यंत हिंदी मराठीसह अनेक विविध भाषेत गाणी गायली आहेत. गायिकेने तिच्या गोड आवाजाने अनेकांना मंत्रमुग्ध केलं आहे. तिने आतापर्यंत गायलेली अनेक गाणी हिट ठरली आहेत. यापैकीच एक म्हणजे 'चिकनी चमेली' हे गाणं. पण, आता गायिकेने अशी गाणी पुन्हा कधीच न गाण्याचा निर्णय घेतला आहे. कलाकार म्हटलं की अनेक जण त्यांनी निवडलेल्या कामांबद्दल प्रतिक्रिया देत असतात. काही टीका

# चिकनी चमेलीसारखं गाणं पुन्हा गाणार नाही

करतात तर काही प्रशंसा करतात. श्रेयाने गायलेल्या गाण्यासाठी तिचं अनेकांनी अनेकदा कौतुक केलं आहे. पण, एकदा तिलाही टीकेला सामोरं जावं लागलेलं. गायिकेने 'चिकनी चमेली' हे गाणं गायल्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावलेल्या असं तिने नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत सांगितलं आहे. श्रेयाने मुलाखतीत याबद्दल सांगितलं आहे. तिला 'चिकनी चमेली' गाण्यासाठी ट्रोल झाली होतीस, तेव्हा तू काहीतरी वादग्रस्त विधानही केलं होतंस असं विचारल्यानंतर ती म्हणाली, मी ट्रोल झाले होते? मला तर माहीतच नाही. मी प्रामाणिकपणे सांगितलेलं. ट्रोल झाले होते असं काही नसेल. मी काही वादग्रस्त बोलले नव्हते. मी म्हणाले होते की मी लहान मुलांसमोर ते गाणं गाऊ शकत नाही. मला नाही योग्य वाटत. पण, चिकनी चमेली फार अश्लील वगैरे असं काही गाणं नव्हतं. श्रेया याबद्दल पुढे म्हणाली, त्यानंतर मला तशा किंबहुना त्यापेक्षाही अधिक जास्त उच्चार न करताना येणार्या किंवा संकोच वाटेल असे शब्द असलेल्या गाण्यांसाठी विचारणा झालेली. पण, मी म्हटलं की मी हे नाही करू शकत. पण, चिकनी चमेली या गाण्याने मला खूप लोकप्रियता मिळाली. ते गाणं खरंतर खूप वेगळं होतं आणि तेव्हा मला तितकी अक्कलही नव्हती की याचा काय अर्थ आहे, पण आता मी विचारपूर्वक निर्णय घेते. श्रेया पुढे म्हणाली, अशी काही गाणी आहेत जी मी नाकारली, पण नंतर ती सुपर हिट झाली. मी खूप कमी विचार करते. मला जर हे योग्य वाटतंय तर मी ते करते.

# वाराणसीचे चित्रीकरण अंटार्क्टिकामध्ये खंडात होणार?



वाराणसी या सिनेमाचे सगळेजण आतुरतेने वाट पाहत आहे. हा सिनेमा अपेक्षेपेक्षा जास्त मोठ्या प्रमाणात शूट केला जाणार आहे याचा सगळ्यांना अंदाज आहे. अशातच आता अभिनेत्री प्रियांका चोप्रा हिने सोशल मीडियावर केलेल्या कमेंटमुळे प्रेक्षकांचा उत्साह वेडगळ आहे. आणि आता हा सिनेमा अंटार्क्टिकामध्ये शूट होणार आहे का असा प्रश्न सगळ्यांना पडला आहे. जेव्हा महेश बाबूंनी प्रियांकाच्या नुकत्याच प्रदर्शित झालेल्या 'द ब्लफ' चित्रपटाचे कौतुक केले आणि तिला टॉप फॉर्ममध्ये म्हटले तेव्हा प्रियांकाने विनोदाने उत्तर दिले, लवकरच अंटार्क्टिकामध्ये भेटू. प्रियांकाच्या या ओळीने चाहत्यांच्या मनात प्रश्न निर्माण केला की हा चित्रपट अंटार्क्टिकामध्ये चित्रित केला जाईल का. प्रियांकाने वाराणसी हा अंटार्क्टिकामध्ये चित्रित होणारा भारतातील पहिला चित्रपट आहे हे थेट सांगितले नसले तरी तिने फक्त विनोदाने लिहिले, अँटार्क्टिकामध्ये भेटू- परंतु या एका ओळीने चित्रपटाच्या जागतिक स्तरावर आणि भारतीय चित्रपटांसाठी एक नवीन बेंचमार्क बनण्याच्या क्षमतेबद्दल अटकळ निर्माण केली आहे. वाराणसी हा चित्रपट एसएस राजामौली यांनी दिग्दर्शित केला आहे, ज्यांना दीपिका पदुकोणने भारतातील सर्वात प्रतिभावान दिग्दर्शकांपैकी एक असे वर्णन केले आहे. महेश बाबू मुख्य भूमिकेत आहेत आणि प्रियांका चोप्रा महिला प्रमुख भूमिकेत दिसणार आहे. हा चित्रपट आयमॅक्स स्वरूपात चित्रित केला जात आहे, ज्यामुळे तो मोठ्या पडद्याच्या अनुभवासाठी परिपूर्ण आहे. वाराणसी हा चित्रपट एप्रिल २०२७ मध्ये प्रदर्शित होण्याची अपेक्षा आहे. प्रियांका सध्या द ब्लफ या चित्रपटात दिसली आहे, जो २६ फेब्रुवारी रोजी ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित झाला. या चित्रपटात कार्ल अर्बन, इस्माइल क्रूझ कॉर्डोवा, सफिया ओकले-ग्रीन आणि वेदांतेन नायडू यांच्याही भूमिका आहेत.



# रश्मिका-विजयनं जिंकलं लोकांचं मन

अभिनेत्री रश्मिका मंदाना आणि अभिनेता विजय देवरकोंडा यांचं अलीकडेच शाही विवाह सोहळा पार पडला. रश्मिका आणि विजयचं लग्न सिनेइंडस्ट्रीसह देशभरात चर्चेत होते. या जोडीने आपल्या वेडिंग सेलिब्रेशनमध्ये तेलंगणातील एका पाठोपाठ एक सामाजिक कार्यातून लोकांची मने जिंकली आहेत. आता या नवविवाहित जोडप्याने तेलंगणातील ४४ सरकारी शाळांसाठी मोठं गिफ्ट दिले आहे. उदयपूर येथे लग्न केल्यानंतर रश्मिका मंदाना आणि विजय देवरकोंडा हे दोघेही नागरकुरनूल जिल्ह्यातील अभिनेता विजयच्या गावी पोहचले होते. तिथे लोकांशी संवाद साधताना विजय देवरकोंडाने मोठी घोषणा केली. अभिनेता म्हणाला की, मी माझ्या देवरकोंडा चॅरिटेबल ट्रस्ट या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून परिसरातील ४४ सरकारी शाळांमधील ९ वी आणि १० वीत शिकणार्या विद्यार्थ्यांसाठी स्कॉलरशिप देण्याचं जाहीर करतो. यातून गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक ती मदत मिळेल आणि कुठल्याही आर्थिक अडचणीशिवाय या मुलांना त्यांचे पुढचे शिक्षण सुरू ठेवण्यासाठी प्रोत्साहन मिळेल यासाठी ही घोषणा करत असल्याचे त्याने जाहीर केले. सोशल मीडियात व्हायरल होत असलेल्या व्हिडिओत विजय तेलुगु भाषेत तिथल्या गावकऱ्यांशी संवाद साधताना दिसतो. ज्यात तो आपल्या शहरातील विद्यार्थ्यांसाठी दिलेले आश्वासन सांगतो. या स्कॉलरशिपचा थेट अशा विद्यार्थ्यांना फायदा होईल जे सध्या बोर्डाच्या परीक्षेची तयारी करत आहेत असा विश्वास विजय देवरकोंडाने लोकांसमोर व्यक्त केला. सोबतच यापुढच्या काळात अधिक वेळा गावात येऊ असा शब्दही विजयने गावकर्यांना दिला. रश्मिका मंदाना आणि विजय देवरकोंडा या दोघांचे २६ फेब्रुवारीला उदयपूर येथे तेलुगु प्रथा परंपरेनुसार लग्न पार पडले. त्यानंतर या जोडप्याने तिरुपती बालाजी मंदिरात आशीर्वाद घेतला होता. दरम्यान, रश्मिका आणि विजय या दोघांनी लग्नानंतर अनेक शहरांमध्ये मिठाई वाटप केले.

# थलपति विजय बायकोला देणार २५० कोटीची पोटगी?

साऊथ सुपरस्टार थलपति विजय त्याच्या पर्सनल आयुष्यामुळे चर्चेत आहेत. थलपति विजयच्या सुखी संसारात वादळ आलं असून २७ वर्षांनी तो पत्नीपासून वेगळं होणार आहे. थलपति विजयची पत्नी संगीताने घटस्फोटासाठी न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. विजयचे साऊथ अभिनेत्रीसोबत विवाहबाह्य संबंध असल्याचा आरोप त्याच्या पत्नीने केला आहे. थलपति विजय बायकोला तब्बल २५० कोटी इतकी रक्कम पोटगी म्हणून देण्यासाठी तयार असल्याचं बोललं जात आहे. वृत्तानुसार, थलपति विजयने न्यायालयीन प्रक्रिया टाळण्यासाठी आणि त्वरित घटस्फोट घेण्यासाठी तोडगा काढला आहे. विजयने त्याच्या पत्नीला २५० कोटींच्या पोटगीची ऑफर दिल्याचं सांगण्यात येत आहे. कुटुंबाची प्रतिष्ठा जपण्यासाठी आणि हे प्रकरण योग्यप्रकारे हाताळण्याच्या दृष्टीने अभिनेत्याने हा निर्णय घेतल्याचं बोललं जात आहे. गेल्या दोन वर्षांपासून थलपति विजय आणि त्याची पत्नी संगीता वेगळे राहत आहेत. पोटगीची रक्कम ही संगीता आणि त्यांच्या दोन मुलांच्या भवितव्यासाठी देण्यात येत असल्याचं म्हटलं गेलं आहे. मात्र अद्याप यावर विजयने प्रतिक्रिया दिलेली नाही. थलपति विजय आणि संगीता यांनी १९९८ मध्ये लग्न केलं होतं. त्यांनी रजिस्टर पद्धतीने लग्न करत संसार थाटला होता. त्यानंतर १९९९ मध्ये त्यांनी हिंदू विधींनुसार पारंपरिक पद्धतीने लग्न केलं. मात्र आता त्यांचा २७ वर्षांचा संसार मोडला आहे. थलपति विजयचं नाव अभिनेत्री तृषा क्रिष्णनसोबत जोडलं जात आहे.



# यशचा 'टॉक्झिक' पोस्टपोन



दाक्षिणात्य सुपरस्टार यशचा बहुप्रतिक्षित चित्रपट 'टॉक्सिक: अ फेअरीटेल फॉर ग्रोन अप्स' १९ मार्च रोजी रिलीज होणार होता. आदित्य धर-रणवीर सिंहच्या 'धुरंधर:द रिव्हेंज'सोबत बॉक्सऑफिसवर होणार हे निश्चित झालं होतं. मात्र आता 'टॉक्झिक'ची रिलीज डेट पुढे ढकलण्यात आल्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मध्यपूर्वेत (मिडल ईस्ट) सुरू असलेल्या संघर्षामुळे सिनेमा पोस्टपोन करत असल्याची घोषणा मेकर्सने केली आहे. सुपरस्टार यशने त्याच्या प्रोडक्शन हाऊस आणि केव्हीएन प्रोडक्शन्सच्यावतीने एक निवेदन जारी करून प्रदर्शनाच्या तारखेतील बदलाचे कारण स्पष्ट केले. निवेदनात म्हटले आहे की, टॉक्झिक: अ फेअरी टेल फॉर ग्रोनअप्स' हा सिनेमा आम्ही ग्लोबल स्तरावर प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्यासाठी बनवला आहे. सिनेमा इंग्रजी आणि कन्नडमध्ये आहे जो स्थानिक आणि जगाभरातील प्रेक्षांपर्यंत पोहोचेल. अनेक वर्षांच्या मेहनतीनंतर १९ मार्चला सिनेमा रिलीज करण्यासाठी आम्ही आतुर होतो. मात्र सध्याची परिस्थिती पाहता विशेषत: मध्य पूर्वेतील संघर्ष पाहता आमचं जागतिक पातळीवरील प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्याचं ध्येय पूर्ण होऊ शकणार नाही. म्हणूनच आम्ही विचार करुन रिलीज डेट पुढे ढकलण्याचा कठीण निर्णय घेतला आहे. तुम्ही आम्हाला समजून घ्याल, संयम ठेवाल आणि असंच प्रेम व पाठिंबा देत राहाल त्यासाठी धन्यवाद. टॉक्झिक आता ४ जून २०२६ रोजी इंग्रजी आणि भारतीय भाषांमध्ये सिनेमागृहात रिलीज होईल. २ मार्च रोजी या चित्रपटातील 'तबाही' हे पहिले गाणे प्रदर्शित झाले होते. या गाण्याचे कौतुक झाले असले तरी, त्याचा व्हिडिओ शेअर न केल्यामुळे चाहते काहीसे नाराज होते. आता चित्रपट पुढे ढकलल्याची ही बातमी समोर आली आहे. 'टॉक्सिक' हा चित्रपट गीतू मोहनदास यांनी दिग्दर्शित केला असून यशने याचे सह-लेखन केले आहे. हा चित्रपट इंग्रजी आणि कन्नड भाषेत चित्रित करण्यात आला आहे. सिनेमात यशसोबत कियारा अडवाणी, तारा सुतारिया, नयनतारा, रुक्मिणी वसंत आंच्या भूमिका आहेत.

# गीतांची वहनशक्ती जाणणारे संगीतकारः जयदेव

निसर्गाशी तादात्म्य पावलेले जयदेव यांना हिमालयातील देवप्रयाग येथील अलकनंदा व भागीरथीच्या संगमाचे स्थान अतिशय आवडायचे. मुंबईस चर्चगेटला एका खोलीत पेईंग गेस्ट म्हणून जन्मभर वास्तव्यास असलेले हे संगीतमहर्षी भिंतीवर त्यांच्या मित्राने काढलेल्या वरील दृश्यातील संगमाच्या स्थानी उभे असलेल्या स्वतःच्या चित्रासमोर खाली एका जाजमावर पेटी घेऊन रियाज करीत.

प्रत्यक्ष देवप्रयागच्या संगमस्थानी बसून संगीत सेवा करतो, असे फिलिंग यायचे. त्या ठिकाणी एकाहून एक चाली सुचायच्या, असे ते सांगत. गीतातील वहन शक्ती अभ्यासून, जाणून त्या शक्तीला सुरांच्या माध्यमातून गती आणणारे जयदेव हे खऱ्या अर्थी महान संगीतकार होते. 'जो मिल गया उसीको मुकद्दर समज लिया जो खो गया मै उसको भुलाता चला गया' शब्द आणि सुरांशी नाजुक लागेबांधे असणार्या या महान संगीतकाराने हम दोनो चित्रपटाला अमर गाण्यांनी यशाच्या पायरीवर नेऊन ठेवले.

मोहम्मद रफी, लता, आशा, तलत, मुकेश आदी महान गायकांनाही स्वरांची तसेच समेवर येतानाची कसरत करायला लावणारे जयदेव मातब्बर संगीतकार होते. सचिनदेवकडे अनेक वर्षे सहायक संगीतकार असताना त्यांनी स्वतंत्र धून तयार केली. १९५५ सालच्या 'जोरू का भाई'मधील दोन पहिलूवाल्या खालील गझलसदृश गाण्याने सुरुवातीच्या स्वतंत्र संगीतात जयदेव यांनी रसिकांचे लक्ष वेधून




घेतले. हे गाणे व संगीत शांत समयी एकांतात निर्जन स्थळी जाऊन ऐकावे तरच यातील भावभावनांचा अर्थ हृदयाला भिडतो. 'ढलती रात है, सितारे है, आज दोनो जहाँ हमारा है सुबह का इंतजार कौन करे..' लता मंगेशकरबद्दल काय बोलावे! कुठल्याही भाषेतील लहेजा शाबूत ठेवून निघणारे स्वर! इंतजार शब्दांचा उच्चार कुण्या उर्दू गायिकेनेही इतका अचूक उच्चारला नसता.

१९६३ सालच्या 'मुझे जीने दो'मधील हे गाणे लता यांच्या गायन खजिन्यातील एक किमती दागिनाच आहे.'मध्यम.. मध्यम'च्या स्वरातून लताच्या कंठातील गांधारच जणू जयदेव यांनी हुडकून काढला. हे नृत्यगीत हॉटिंग साँगच्या स्वरूपातले विस्मयकारक गीत आहे. या गाण्यातील 'छम छम, छम छमऽऽ' हे कोरसमधील शब्दस्वर नृत्याला स्टेप्स देऊन मोहकतेचा कळस गाठतो. 'नदी नारे न जावो श्याम पैया पडू...' वरील चित्रपटातले लोकसंगीताच्या बाजूने रचलेले साहिर व जयदेव यांच्या जोडीचे हे उच्च प्रतीचे अभिनव गीत आहे. या गाण्यात दोन-तीन वेळा 'जय जय करो' म्हणणारी अगतिक नारी 'संग सौतनिया न लावो श्याम' म्हटल्यावर 'पैंया पडू' असे आर्जव करते. शब्दांची वीण संगीतकाराने कुशलतेने उकलली आहे. 'अब कोई गुलशन न उजडे अब वतन आझाद है' देशभक्तीपर वेगळ्या थाटात व स्वरूपात रचलेले रफी यांच्या आवाजातील हे गीत जयदेव यांची वेगळी प्रतिमा वरील सिनेमात साकार करते. 'तू चंदा मै चांदनी तू तरुवर मै शाख रे' १९७१ सालच्या 'रेश्मा और शेरा'मधील जयदेव यांच्या संगीतात, लता यांच्या स्वरात सजलेले हे स्वरशिल्प आहे. मिश्र मांड रागात जयदेव या कलाबाज संगीतकाराने या गीतात मधुर स्वरांचा अर्क उतरवला आहे.

'देखली तेरी खुदायी बस मेरा दिल भर गया' (तलत) 'जब गमे इष्क सताता तो फिर याद आती हो' (मुकेश) 'किनारे किनारे' चित्रपटातील दुःखाला पाझर फोडणारी वरील दोन्ही गाणी जयदेव यांचीच फलश्रुती आहे. अनेक रचना लोकाश्रयास पारख्या झाल्यात. १९७६ साली मदनमोहन यांच्या अकाली निधनाने 'लैला मजनू' चित्रपटातील उरलेले संगीत व तीन गाणी जयदेव यांनी केलीत. महान कवी हरिवंशराय बच्चन यांच्या 'मधुशाला', कवी दिनकर यांच्या 'उर्वशी' तसेच प्रसिद्ध कवयित्री महादेवी शर्मा यांच्या कित्येक रचनांना चालबद्ध करून संगीतात बांधल्या. ३० वर्षांत मोजून ३६ चित्रपटांना मधुर मोहक संगीत देऊनही केवळ चार-पाच चित्रपटांनाच बॉक्स ऑफिसवर यश संपादन करता आले. परंतु त्यांची गाणी आजही लोक आवडीने गातात. जयदेव म्हणायचे गाण्याचा मुखडा बनविण्यात संगीतकाराचे कसब असते; बाकी गाण्याची बांधणी अचूक वाद्यांची करामत असते. ३ ऑगस्ट १९१८ रोजी दक्षिण आफ्रिकेतील नैरोबी येथे जयदेव वर्मा यांचा जन्म झाला. अभिनेता बनण्यासाठी मुंबई गाठली. १९३३ साली 'वामन अवतार' चित्रपटात नारद मुनी साकारले. तीन-चार चित्रपट केल्यावर लुधियानास परत येऊन अल्मोडा येथे उदयशंकर कल्चरल अॅकॅडमीत उमेदवारी केली. रेडिओवर गाणी म्हटली.

१९५१ साली अली अकबर खां यांच्याकडे सहायक संगीतकार बनले. दोन-तीन चित्रपटानंतर खानसाहेब मुंबई सोडून गेले. नंतर एस. डी. बर्मनकडे सहायक म्हणून रुजू झाले. जयदेव हे जन्मभर अविवाहित राहिले. 'रेश्मा और शेरा', 'गमन' अशा काही चित्रपटाच्या संगीतासाठी त्यांना तीन वेळा राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाले. चंदेरी दुनियेत ऐश्वर्यसंपन्न व ऐशआरामी सहकार्यासोबत राहूनही ते अलिप्त राहिले.

मुंबईस चर्चगेटमध्ये एका खोलीत पेईंग गेस्ट म्हणून वास्तव्यास होते. तिथेच ६ जानेवारी १९८७ रोजी पवित्र देवप्रयाग येथील भागीरथी-अलकनंदा नद्यांच्या संगमाच्या भिंतीवर चितारलेल्या पोर्ट्रेटखाली कुठलीही तक्रार न करता शांततेने निधन पावले; जणू गंगेने त्यांना पोटात घेतले. 'जो मिल गया उसीको मुकद्दर समझ लिया'

अल्लाह तेरो नाम ईश्वर तेरो नाम सबको सन्मती दे भगवान...' त्या काळी धार्मिक एकतेचे प्रतीक असलेले हे गीत साहिर यांनी 'बैजू बावरा' चित्रपटात 'मन तरपत हरी दर्शन को' हे भक्तिगीत शकील बदायूनी यांनी लिहिले. सर्वधर्मसमभावाचे हे मोठे उदाहरण होय. १९६१ सालच्या 'हम दोनो' चित्रपटातील भक्तिभावाने मनाची तार छेडणाऱ्या व करुण रसात भिजलेल्या स्वरात लता यांनी ते आळवले. संगीतकार जयदेव यांच्या संगीतातील सूर प्रार्थनेला साजेसे गंभीर झाले होते. १९७१ साली सीमेवर जवानांसाठी आयोजित संगीत रजनीत लता मंगेशकर यांनी हे गाणे गाऊन सर्वांना खिळवून ठेवले. आपल्या गाण्याची दखल घेतल्याच्या आनंदात संगीतकार जयदेव तर अभिमानाने फुलून गेले.

**रमेश पोफळी**

# गोविंदा नीलमबरोबरच्या रिलेशनशिपबद्दल म्हणाला...

गोविंदाला नव्वदच्या दशकातील सुपरस्टार म्हणून ओळखले जाते. गेल्या काही दिवसांपासून मात्र अभिनेता त्याच्या खासगी आयुष्यामुळे चर्चेत आहे. गोविंदाची पत्नी सुनीता आहुजांनी त्याचे अफेअर असल्याचे म्हटले होते. तसेच १९८०, १९९० च्या दशकात नीलम कोठारीबरोबर तो रिलेशनशिपमध्ये होता, अशा चर्चा झाल्या होत्या. आता गोविंदाने एक मुलाखत दिली. या मुलाखतीत गोविंदाला विचारले की तो नीलमच्या प्रेमात होता का? यावर अभिनेता म्हणाला, आम्हा गावातील तरुणांना गोऱ्या मुली आवडतात. ती सगळ्यांपेक्षा वेगळी होती, चांगली मुलगी होती, मी तिचे चित्रपट पाहत असे. मी कधी विचारही केला नव्हता की मला तिच्याबरोबर काम करण्याची संधी मिळेल. जेव्हा तिने माझी नायिका म्हणून काम केले, तेव्हा मला विश्वास बसला नाही. 'लव्ह ८६' या चित्रपटातून नीलम आणि गोविंदाची ऑनस्क्रीन जोडी चांगलीच गाजली होती. त्यानंतर त्यांनी 'हत्या', 'सिंदूर', 'खुदगर्ज' या चित्रपटांत एकत्र काम केले. हे चित्रपटही चांगलेच गाजले. गोविंदा नीलमबरोबर रिलेशनशिपमध्ये होता की नाही, यावर



स्पष्टपणे बोलला नाही. पण, त्याच्या मनात अभिनेत्रीबद्दल भावना निर्माण झाल्या होत्या असे वक्तव्य त्याने केले. तो म्हणाला, आता जसे अफेअर्स होतात, तसे, त्या काळात अफेअर्स होत नसत. पण, आम्ही सेटवर खूप दंगा करत असू. रोमान्सची व्याख्या त्या काळात काय होती यावर गोविंदा म्हणाला, त्या काळात फक्त पाहणे हा रोमान्स असायचा. आम्ही एकत्र खूप चांगले काम केले आहे. १९९० ला गोविंदाने स्टारडस्टला मुलाखत दिली होती, त्यावेळी तो नीलमच्या प्रेमात होता हे त्याने कबुल केले होते. इतकेच नाही, तिच्या प्रेमात पडल्यानंतर त्याने सुनीता आहुजांबरोबरचा साखरपुडा मोडला होता, कारण त्याला नीलमबरोबर लग्न करायचे होते. गोविंदा म्हणाला, आम्ही अनेकदा भेटायचो. ती इतकी प्रेमळ होती, कोणताही पुरुष तिच्या प्रेमात पडेल. मी माझा सुनीताबरोबरचा साखरपुडा मोडला. मला नीलमबरोबर लग्न करायचे होते. मला वाटत नाही की त्यामध्ये काही चुकीचे होते. दरम्यान, गोविंदाने आईच्या शब्दासाठी सुनीताबरोबर लग्न केले. त्यांना दोन मुले आहेत. गेल्या काही काळात हे जोडपे विभक्त झाल्याच्या अनेक चर्चा झाल्या, मात्र गोविंदा आणि सुनीता यांनी त्या चर्चा अफवा असल्याचे सांगितले.

# 'सालबर्डी' गावात 'ती' एन्ट्री घेणार



गेल्या काही दिवसांपासून सोशल मीडियावर आणि चित्रपटप्रेमींमध्ये एका खास गोष्टीची चर्चा रंगली होती ती म्हणजे 'सालबर्डी' सिनेमाच्या पोस्टर झळकणारी अभिनेत्री नेमकी कोण आहे? तिची ओळख गुप्त ठेवण्यात आली असली तरी तिची झलक पाहण्यासाठी चाहत्यांची आतुरता शिगेला पोहोचली होती. अखेर तिची ओळख सर्वांसमोर उघड झालेली आहे. मराठी चित्रपटसृष्टीत आघाडीच्या नायिकेला पोलिसांच्या वर्दीत पाहणं हे तसं दुर्मिळच. मात्र आगामी 'सालबर्डी' चित्रपटात ही चौकट मोडत पूजा सावंत एका करारी, निर्भीड आणि तडफदार पोलिस अधिकार्याच्या भूमिकेत प्रेक्षकांसमोर येत आहे. पी.आय.मनोरमा प्रधान असं तिच्या व्यक्तिरेखेचं नाव आहे. नुकताच 'सालबर्डी' या चित्रपटाचा दमदार टीझर प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. या सोहळ्यात पूजाने डॅशिंग एन्ट्री घेत आपल्या भूमिकेची झलक प्रेक्षकांना दाखवली. या व्यक्तिरेखेसाठी तिने विशेष मेहनत घेतली असून, पोलिसांची देहबोली, अधिकारपूर्ण संवादशैली आणि शिस्तबद्ध वर्तन या सगळ्या गोष्टींचा अभ्यास करत ही भूमिका पूजाने साकारली आहे. वास्तवदर्शीपणा जपण्यासाठी तिने प्रत्यक्ष पोलिस अधिकाऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या कामकाजाचं बारकाईने निरीक्षण सुद्धा केलं. आपल्या भूमिकेबद्दल बोलताना पूजा सांगते, वर्दी अंगावर चढताच एक वेगळाच रुबाब आपोआप येतो. तो वेगळा दाखववा लागत नाही. वर्दीतच एक ताकद असते. माझी ही भूमिका प्रत्येक स्त्रीला प्रेरणा देणारी ठरेल. यामधील थरारक स्टंट्स आणि दमदार ॲक्शन सीन्स हे 'सालबर्डी' सिनेमाचे खास आकर्षण असणार आहेत. येत्या १७ एप्रिलला हा चित्रपट सर्वत्र प्रदर्शित होणार आहे. पूजा या सिनेमाच्या निमित्ताने मनोरमा प्रधान म्हणून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. नेटकर्यांसह मराठी कलाकारांनी तिला या नव्या सिनेमासाठी भरभरून शुभेच्छा दिल्या आहेत.

# प्राजक्ता माळीची 'ती' पोस्ट चर्चेत

मराठी चित्रपटसृष्टीतील आघाडीची अभिनेत्री म्हणून प्राजक्ता माळीकडे पाहिले जाते. प्राजक्ताने आजवर अनेक मराठी, हिंदी चित्रपट आणि वेबसिरीजमध्ये अभिनय केला आहे. प्रेक्षक तिच्या कामाचे नेहमी भरभरून कौतुक करत असतात. ती देखील नेहमी आपल्या भूमिकेतून काहीतरी नवीनी देण्याचा प्रामाणिक प्रयत्न दरवेळी करत असते. सोशल मीडियावरील तिच्या पोस्टला तिचे चाहते कमेंट्स करत असतात. तिच्या अनेक पोस्ट विविध कारणांमुळे चर्चेतही असतात. नुकतीच अभिनेत्रीने अशी एक पोस्ट इंस्टाग्रावरून केली आहे, ज्यामुळे ती पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. प्राजक्ता माळीने सोशल मीडियावर एक व्हिडिओ शेअर केला आहे. त्या व्हिडिओमध्ये प्राजक्ताने बाय बाय फोन पुढच्या १५ दिवसांसाठी असे कॅप्शन दिले आहे. साहजिक तिच्या कॅप्शनने चाहत्यांच्या मनात प्रश्न निर्माण झाला आहे. या पोस्टमधून प्राजक्ताने पुढील १५ दिवस ब्रेक घेण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. सध्या ती श्री श्री रविशंकर यांच्या आर्ट ऑफ लिव्हिंग या आश्रमात गेली आहे. तिथे जाऊन प्राजक्ता पुढील १५ दिवस अध्यात्मात तल्लीन होणार आहे. त्यामुळेच १५ दिवस फोनपासून ती दूर असणार आहे. या दिवसांमध्ये चाहते तिचे फोटो आणि पोस्टला मिस करतील. प्राजक्ताच्या कामाच्या बाबतीत बोलायचे झाल्यास, ती सध्या 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' शोचं सूत्रसंचालन करत आहे. या शोमध्ये प्राजक्ता तिच्या खुमासदार सूत्रसंचालनाने प्रेक्षकांचे मन जिंकते. याशिवाय ती हास्यजत्रेत स्कीट करणाऱ्या कलाकारांना प्रोत्साहन आणि दाद देताना दिसते.




# नेहाला आई व्हायचचं नाहीयं

अभिनेत्री नेहा पेंडसे लवकरच 'तिघी' या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटात ती प्रमुख भूमिकेत दिसणार आहे. तिच्याबरोबर सोनाली कुलकर्णी, भारती आचरेकरदेखील महत्वाच्या भूमिकेत आहेत. नेहाने नुकतीच एक मुलाखत दिली. या मुलाखतीत आई होण्याबद्दल ती मोकळेपणाने बोलली. लग्नानंतर आयुष्य बदलते असे म्हणतात. तर, तुला असं वाटतं का, की व्यक्ती म्हणून तू लग्नानंतर बदललीस? त्यावर नेहा म्हणाली, हो, मला खरंच वाटतं. माझा वैयक्तिक विकास झाला, तो लग्नानंतरच झाला माझ्या नवऱ्याचे व्यक्तिमत्व खूप उत्तम आहे. लग्नानंतर मला स्वतःला खूप बदलावं लागलं. पण, तुम्ही ते प्रेम करता करता आणि त्यामध्ये काही चुकीचं नाही. तुम्हाला बदल करावे लागतात. जसे मी स्वतः मध्ये काही बदल केले, तसेच त्यानेही त्याच्यामध्ये बदल केलेत. त्याशिवाय कोणतेही लग्न सुखा-सुखी टिकत नाही. आता आपल्या विचारांची समज वाढलेली असते. आपल्याला नक्की काय हवंय, काय नकोय हे माहीत असतं. थोडं उशिरा लग्न करणं हा योग्य निर्णय असतो का? यावर नेहा म्हणाली, हे सगळ्यांकरता लागू नाही. मी लहानपणापासून काम करत असल्याने माझं आयुष्य वेगळं असल्याने, मी महत्वकांक्षी असल्याने आणि अशा इतर काही कारणांमुळे मला हे योग्य वाटलं. एकतर आपण जी इंडस्ट्री निवडली आहे. त्यामध्ये ठरवलेली वेळ नसल्याने आपल्याला पर्याय नाही. प्रत्येक मुलीने इतकं महत्वकांक्षी असणे गरजेचे नसते. काही मुलींना मातृसुखात त्यांची वाढ दिसते, विकास दिसतो. जीवनाचा उद्देश दिसतो. फक्त मला एक असं वाटतं की, प्रत्येक मुलीने तिला काय हवंय हे जाणून घेण्यासाठी एका ठराविक वयापर्यंत थांबलं पाहिजे. अगदी विसाव्या किंवा एकविसाव्या वर्षी लग्न करू नये. तुमच्या मनात जे आहे ते तुम्ही थोडसं करावं. मग तुम्हाला वाटू शकते की, मी इतर गोष्टी केल्या पण मला आई बनण्यात आनंद आहे. तर त्यामध्ये काही चुकीचे नाही. आई झाल्यानंतरही ती स्वतंत्रता अनुभवू शकता. सगळ्याचा अनुभव घ्यावा आणि स्वतःचे निर्णय घ्यावेत. तुझ्या प्लॅन्समध्ये आई होणं आहे का? असे विचारल्यानंतर नेहा नाही म्हणाली. अभिनेत्री म्हणाली, मी माझे बीजांड गोठवले आहेत. लग्नानंतर मला एका पॉईंटला वाटलं होतं की मला आई व्हायचं आहे. तेव्हा मी आई होऊ शकले नाही, आई झाले नाही. त्या सगळ्या प्रोसेसमध्ये मी इतकी निराश झाले की मला वाटलं की मला आता आई व्हायचं नाही. तेव्हा मी विचार केला की कदाचित आता माझ्या मनामध्ये राग आहे. पण मी माझे बीजांड गोठवून ठेवते. बघूयात पुढे वाटलं तर आई होता येईल. पण, मला वाटतं आता मला आई व्हायचं नाही. मला ती जबाबदारी नकोय, असे म्हणत अभिनेत्रीने तिला आई व्हायचं नाही असे सांगितले.



# वेबसीरिजमध्ये दिसणार अक्षय कुमार



ओटीटीच्या जगतात कलाकारांचा प्रवेश वाढत चालला आहे. बॉबी देओलपासून शाहिद कपूर, अजय देवगण आणि सनी देओल यासारख्या कलाकारांनी चित्रपटांसोबत डिजिटल जगतातही सक्रीय होत चाहत्यांना आनंदीत पेले आहे. ओटीटीवर स्टार्स केवळ चित्रपटच नव्हे तर आता वेबसीरिजही करू लागले आहेत. अनेक कलाकारांनंतर आता अक्षय कुमारही स्वत:च्या पहिल्या वेबसीरिजसाठी तयार आहे. ओटीटीवर त्याचे अनेक चित्रपट प्रदर्शित झाले आहेत, परंतु आता अक्षय ७ वर्षांपासून रखडलेल्या वेबसीरिजमध्ये काम करणार आहे. अमेझॉन प्राइम व्हिडिओकडून अक्षय कुमारसोबत 'द एंड' या वेबसीरिजची घोषणा अनेक वर्षांपूर्वी करण्यात आली होती. २०१९ मध्ये झालेल्या या घोषणेनंतर कोरोना संकट आले, डिजिटल प्लॅटफॉर्मवर अजय देवगण आणि रविना टंडनसमवेत अनेक मोठ्या कलाकारांच्या वेबसीरिज यशस्वी ठरल्या नाहीत. यादरम्यान अक्षयची सीरिज 'द एंड'चे कामही रखडले. परंतु याचा निर्माता विक्रम मल्होत्राने आता सीरिजला नवी दिशा दिली जात असल्याचे सांगितले आहे. हा प्रकल्प बंद झालेला नाही. याची कहाणी लिहिण्यास वेळ लागतोय, आम्ही त्याला एक नवी दिशा दिली असून नव्या दिग्दर्शनात ती तयार होणार आहे. काळासोबत प्रेक्षकांची पसंतीही बदलत राहते, यामुळे त्यानुसार आम्ही याच्या कहाणीत बदल करत आहोत, असे विक्रमने सांगितले आहे. अक्षय कुमारचा 'वेलकम टू द जंगल' हा चित्रपट यंदा प्रदर्शित होणार आहे. तर अक्षय या वेबसीरिजचे चित्रिकरण लवकरच सुरू होणार आहे. याचबरोबर तो टीव्हीवर 'व्हील ऑफ फॉर्च्यून' मधून प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे.

# रिंकूला वाटते प्रेमाची भीती



रिंकू राजगुरूने नुकतीच एक मुलाखत दिली. त्या मुलाखतीत रिंकू म्हणाली की, मी सिंगल आहे. सध्या माझ्या आयुष्यात कोणीच नाहीये. पण, प्रेमावरती माझा प्रचंड विश्वास आहे आणि मला असं वाटतं की, प्रेम ही जगातील सर्वांत सुंदर गोष्ट आहे आणि आता सगळ्यात जास्त मला त्याच गोष्टीची भीती वाटते. प्रेमाची भीती का वाटते, असे विचारल्यानंतर रिंकू म्हणाली, सध्याची पिढी प्रेमाचा विचार वेगळ्या पद्धतीनं करते. मी अशी आहे की, जर मी प्रेमात पडले, तर माझ्यासाठी प्रेमच सर्व काही असतं. म्हणजे मी लग्नाचाच विचार करते. जे रिलेशनशिपमध्ये ओके असतात ते ठीक आहे. मला असं वाटतं की, आपण ज्यावेळी कोणामध्ये भावनिकरीत्या गुंततो, त्यावेळी किती नाही म्हटलं तरी आपण त्या माणसावर अवलंबून राहतो. आजकाल ती भीती असते. आजकाल कोणत्याही कारणावरून कोणीही कोणाला सोडू शकतं. पुढे ती म्हणाली, आपल्या आई-वडिलांच्या काळात असं असायचं की समजून घेऊ, काहीतरी मार्ग निघेल. आता म्हणजे पर्याय इतके आहेत की, एखाद्या व्यक्तीचे वागणे खटकले की, लगेच दुसरा पर्याय शोधला जातो. त्याच्यामुळे मला त्या गोष्टीची प्रचंड भीती वाटते की, कोणावर विश्वास ठेवायचा का? प्रेम केलं, तर ते टिकेल का? कोणी सोडून तर देणार नाही ना? कारण- मला वाटतं की, प्रेम असेल तर ते शेवटपर्यंत असावं आणि ते खरं असावं. त्याच्यामुळे माणसं आणि प्रेम या गोष्टींची मला आजकाल प्रचंड भीती वाटते. तिचे हे उत्तर ऐकल्यानंतर तिला विचारले गेले की, तू सिंगल असण्याचं हे कारण आहे का? त्यावर ती म्हणाली, हो. मला जो व्यक्ती म्हणेल की, तू मरेपर्यंत माझी बायको राहशील. त्याच्याबरोबर मी लग्न करेन आणि छान राहीन. पण, सध्या मला रिलेशनशिपची भीती वाटते.

# अजय माझ्याशी १८ वर्षांपासून बोलत नाही



दाक्षिणात्य बॉलीवूडमध्ये वाद नवीन नाहीत. बरेच कलाकार काही कारणास्तव एकमेकांशी बोलत नाहीत. सलमान खान व शाहरुख खान यांच्यातही काही वर्षे अबोला होता. खरं तर एखादा चित्रपट फ्लॉप झाला की त्याच्या अपयशाची जबाबदारी कलाकारांवर नाही, तर दिग्दर्शकावर जास्त असते. अशाच एका दिग्दर्शकाचा चित्रपट फ्लॉप झाला आणि अजय देवगणने त्याच्याशी बोलणं सोडलं. या दिग्दर्शकाने स्वतः याबद्दल खुलासा केला आहे. या दिग्दर्शकाचं नाव अनुभव सिन्हा. अनुभव सिन्हा यांनी ठर. जपश, मुल्क, आर्टिकल १५ असे अनेक वेगळ्या धाटणीचे चित्रपट बॉलीवूडला दिले आहेत. पण त्यांनी त्यांच्या करिअरमधील सर्वात मोठा फ्लॉप चित्रपट अजय देवगणबरोबर केला होता. महत्त्वाचं म्हणजे त्यानंतर अजय देवगण व अनुभव सिन्हा एकमेकांशी बोलत नाहीत. या गोष्टीला आता १८ वर्षे झाली असून सिन्हांनी स्वतः ही माहिती दिली आहे. हे सगळं ज्या चित्रपटामुळे घडलं त्याचं नाव आहे 'कॅश'. हा चित्रपट फ्लॉप झाल्याचा अनुभव सिन्हा व अजय देवगणच्या नात्यावर परिणाम झाला आणि दोघेही परत कधीच भेटले नाहीत.

उल्टा चष्मा (यूसी) या यूट्यूब चॅनलशी बोलताना अनुभव म्हणाले, अजय देवगण खूप चांगला माणूस आहे. पण कधीकधी चित्रपट चालत नाहीत, तेव्हा एकत्र काम करणाऱ्या टीम वेगळ्या होतात. मी अजयबरोबर माझ्या करिअरमधील सर्वात वाईट चित्रपट 'कॅश' बनवला. तो खरंच खूप वाईट चित्रपट आहे. टीममधील लोकांना त्याबद्दल नाराज व्हायचा पूर्ण अधिकार आहे. तो बेजबाबदारपणाने बनवलेला चित्रपट होता. त्या चित्रपटानंतर अजय आणि मी वेगळे झालो. आम्हाला पुन्हा कधीही एकमेकांना भेटण्याची संधी मिळाली नाही. अजय देवगण मागील १८ वर्षांपासून बोलत नसल्याचं अनुभव सिन्हांनी सांगितलं. आम्ही कधीच भांडलो नाही. पण तो माझ्याशी बोलत नाही आणि मला त्याच कारणही माहित नाही. आम्ही 'कॅश' सिनेमा बनवल्यानंतर भेटलोच नाही, त्यामुळे तो माझ्याकडे दुर्लक्ष करतोय असंही मी म्हणू शकत नाही. कदाचित मी जास्त विचार करत असेन. मी त्याला अनेक मेसेज केले, पण त्याने कधीच उत्तर दिलं नाही. म्हणून मी स्वतःला समजावलं की कदाचित माझे मेसेज त्याच्यापर्यंत पोहोचलेच नसतील. पण १८ वर्षे झाली आहेत, आम्ही बोललो नाही, असं अनुभव सिन्हा म्हणाले. अनुभव सिन्हा आणि अजय देवगण यांनी २००७ मध्ये 'कॅश' नावाचा एक चित्रपट एकत्र केला होता. या सिनेमात अजय देवगण, सुनील शेट्टी, ईशा देओल, रितेश देशमुख, झायेद खान, शमिता शेट्टी, आयशा टाकिया आणि दिया मिर्झा हे कलाकार होते. हा चित्रपट फ्लॉप ठरला आणि यामुळे अनुभव सिन्हा व अजय देवगण यांच्यातील संबंध ताणले गेले.

